२०

# ओझं

पुलावर उभं राहून वडापाव खाता खाता वाहत्या पाण्याच्या प्रवाहाकडे तो एकटक पाहात होता.... याच पाण्याच्या अभावाने त्याच्या भागात गेली कित्येक वर्षे दुष्काळ हटत नव्हता. याच दुष्काळाने त्याच्या बापाचा बळी घेतला होता. बापाने आत्महत्या केली आणि आई खंगून गेली. मग त्यानं गाव सोडलं आणि आज तो पाण्याच्या प्रदेशात आला होता.

कठड्याला टेकून वाहता प्रवाह पहात बराच वेळ उभा होता.... त्याच्या जीवनात तसा काही अर्थ नव्हताच. पण खालून वाहतं जीवन त्याला दिलासा देत होत.... शेजारी एक कावळा बराच वेळ ओरडत असल्याचं आता त्याच्या ध्यानात आलं. वडापावचा शेवटचा तुकडा त्यानं कावळ्यापुढ टाकला... वडापावचा कागद चुरगाळून टाकण्याआधी सवयीन सहज वाचला... शहरात रोगाची साथ आली होती आणि प्रशासनानं पाणी उकळून पिण्याच आवाहन केलं होते. कागद चुरगाळून त्यान टाकून दिला. कावळ्याकडं लक्ष गेलं तर, कावळा वडापाव खात होता... त्याच्या बापाचा आणि आईचा नैवेद्य कावळ्याने शिवला नव्हता.... ते त्याला आठवलं.... खाली वाहणारं पाणी, चुरगाळलेला कागद, आणि तो कावळा.... या दृष्यानं एक वेगळीच चमक त्याच्या मनात उठली.... तो तिथून निघाला....

गावाकडचं होत नव्हतं ते सारं त्यानं विकून टाकलं होतं. थोडेफार पैसे जवळ होते.... त्यान एक छानपैकी शर्ट पॅन्ट खरेदी केली. एका सलूनमध्ये

जावून थोबाडाला चेहऱ्याचं रूप दिलं.... एका मोठ्या दुकानातून त्यानं पाणी शुद्धीकरणाच यंत्र खरेदी केलं...दोन पोती रिकाम्या बाटल्याही विकत घेतल्या आणि नुकत्याच घेतलेल्या भाड्याच्या खोलीत आला.

रात्रभर त्यान शुद्ध पाण्याच्या बाटल्या भरल्या. दुसऱ्या दिवशी या बाटल्या विकण्यास तो बाहेर पडला. जेमतेम ५ बाटल्या विकल्या गेल्या.... रात्रीचं जागरणं आणि दिवसभराची वणवण, दमला बिचारा.... कालच्या सारखाच वडापाव घेवून पुलावर आला.... काही क्षणात कावळा ही आला... मग दोघांनी वडापाव खाल्ला... आज कागदावर भ्रष्टाचाराची बातमी होती....

दुसऱ्या दिवशी त्यानं पैशाची काही पाकीटं बनवली.... आणि मोठ्या रूबाबात तो खोलीतून बाहेर पडला. तडक पाणीपुरवठा अधिकाऱ्यांच्या पुढ्यात उभा राहिला.... त्यानं अधिकाऱ्याच्या कानात सांगितलं. साहेब, थोडे दिवस पाणी शुद्धीकरण यंत्रणेकडे दुर्लक्ष करा, ही घ्या छोटीशी भेट.... ही वारंवार भेटत राहील.'' अधिकाऱ्यानं पाकीट उघडून पाहिल पगारापेक्षा जादा रक्कम होती.... त्यानं पाकीटाला जागायचं ठरवलं.... त्या अधिकाऱ्याचा निरोप घेवून तो बाहेर पडला आणि त्या शहरातल्या नामांकित डॉक्टरांना भेटला... डॉक्टरांनी सर्व पेशंटना बाटली बंद पाणी पिण्यास सांगावं अस त्यानं सांतिलं... नुसत सांगितलं नाही तर प्रत्येकाच्या टेबलावर पाकीटं ही ठेवलं.... डॉक्टर हरकले त्याची सूचना योग्य होती वर फुकटचे पैसे !

दुसऱ्या दिवशी नळाला पिवळसर रंगाचं पाणी आलं.... दवाखाने पेशंटनी भरून गेले.... बाहेर पडणारा जो तो पाण्याच्या बाटल्या घेवू लागला....

पाकीटं पोहचवणे आणि बाटल्या विकणे यात तो गढून गेला... दिवस पालटले..... आज त्याच्याकडं अलिशान बंगला, फार्म हाऊस.... शेतीवाडी, नोकर चाकर आणि भरपूर गाड्या आहेत.... पाणी शुद्धीकरणांच्या त्याच्या मोठ्या प्लँटमधून कंटेनरच्या कंटेनर माल बाहेर पडतो.... पाकीट मात्र आता पोहोच होत नाहीत. तर ते ते लोक स्वत: येवून घेवून जातात....

आज आपल्या आलिशान गाडीतून तो त्याच पुलावरून जात होता. त्याला ते दिवस आठवले. त्यानं गाडी थांबवली... सोबतच्या डब्यातलं एक सॅन्डविच हातात घेवून तो खाली उतरला... निवांत कठड्याला टेकून प्रवाहाकडे पाहात सॅन्डविच खावू लागला.... त्याच्या अपेक्षेप्रमाणे काही क्षणात कावळा आला.... त्यानं सॅन्डवीच कावळ्यापुढं टाकलं..... सॅन्डवीच भोवती कावळा घुटमळला... आणि त्याला चोचही न लावता उडून गेला... आई वडीलांचा न शिवलेला नैवेद्य त्याला पुन्हा आठवला अस्वस्थ झाला....

कावळ्यान न शिवलेला तो खावूचा तुकडा आणि त्याची ती अलिशान गाडी यांच्या बरोबर मध्येच तो उभा होता.... अंगावरच्या उंची कपड्याचं ओझं पेलत.....

❏ ❏ ❏

॥ श्री ॥

लघुकथा लेखन स्पर्धेसाठी.

लघुकथा.

ओझं.

लेखक :- राजेंद्र नारायण पोळ
पंचतत्त्व मंदिर, कर्नाळ रस्ता,
सांगली. (महाराष्ट्र) ४१६४१६